# Washim District Police

**Nature of Work** :- **Seizing Illegal Nylon Manja**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **13/01/2023**

**Brief of the work done :-**

प्रतिबंधित नायलॉन/चायनीज मांजाची विक्री ; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल.

लोकमत

# प्रतिबंधित नॉयलॉन मांजाची विक्री; वाशिम शहरात चार जणांवर गुन्हे

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक मोहीम : विविध ठिकाणी तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : शासनाने पतंगाकरिता चायनीज,नायलॉन मांजा साठवणूक, विक्री व वापर करण्यावर प्रतिबंध घातला आहे. असे असतानाही जिल्ह्यात काही ठिकाणी या मांजाची विक्री होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या तपासणीत नॉयलॉन मांजाची विक्री करताना आढळून आलेल्या चार आरोपींवर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व शाखा प्रमुखांना चायनीज, नायलॉन मांजाची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात आदेशित केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी वेगवेगळे पथक स्थापन करून चायनीज,नायलॉन मांजाची साठवणूक व विक्री करणाऱ्यांवर कारवाया केल्या. पोलीस स्टेशन वाशिम शहर हद्दीतील जुन्या नगर परिषदजवळील एका दुकानातून नायलॉन मांजाचे २ किलो वजनाचे आणि २ हजार रुपये किमतीचे एकूण ८ बंडल जप्त करून संबंधित आरोपीविरुद्ध पो. स्टे. वाशिम शहर येथे कलम ५ पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याशिवाय मंगरुळपीर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील दत्तमंदिराजवळील दुकानातून २ हजार ५०० रुपये किमतीचे ३ किलो वजनाचे ५ बंडल, पठाणपुरा, मंगरूळपीर येथील एका दुकानातून १ हजार ५०० रुपये किमतीचे १.५ किलो वजनाचे ३ बंडल, पो. स्टे. मंगरूळपीरच्या पथकाने व्हिडिओ चौक, तसेच मंगरूळपीर येथील एका जनरल स्टोअर मधून नायलॉन मांजाचे ५० रुपये किमतीचे २ रील, असा एकूण ४५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पो.स्टे.मंगरूळपीर येथे संबंधित आरोपींवर अनुक्रमे कलम ५ पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण ४ प्रकरणांमध्ये ४ आरोपींवर प्रतिबंधित चायनीज, नायलॉन मांजा विक्रीकरिता साठवून ठेवल्याप्रकरणी कारवाई करत एकूण ६५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्ह्यात नायलॉन मांज्याच्या विक्रीवर नियंत्रणासाठी प्रशासन दक्ष आहे.

### व्यावसायिकांना खबरदारीचा इशारा



मकर संक्रांतीला सर्वत्र पतंग उडविण्यात येतात. पतंग उडविण्यासाठी नायलॉन, चायनीज मांजाच्या वापरामुळे पशु, पक्षी तसेच मनुष्यास हानी तसेच जीवितहानीचे प्रकार घडलेले आपणास पाहावयास मिळतात. त्यानुषंगाने शासनाने पतंगाकरिता चायनीज,नायलॉन मांजा साठवणूक, विक्री व वापर करण्यावर प्रतिबंध घातला आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी या मांजाची विक्री करु नये, असे आवाहन पोलिसांनी केले असून, विक्री करताना आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे.